# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०१.०२.२०२३

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ३१/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २२,४००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि. ३१/०१/२०२३ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतांनकडुन ०५.७६ लिटर दारू असा एकुण ३,१९०/—रू.किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि. ३१/०१/२०२३ रोजी जुगार कायद्या अंतर्गत जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी असा एकुण ६८०/—रूपये जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपघाताचे दाखल गुन्हे:—**

दि. ३१/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली ग्रामीण येथे कलम ३०४अ,२७९,४२७ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद आरोपी मोटार सायकल क्रं.एम.एच.३८ ए.ई.२१९६ च्या चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात, हयगईने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा भाउ चालवित असलेली मोटार सायकल क्रं.एम.एच.३८ क्यु ३३७७ ला पाठीमागुन जोराची धडक देवून साक्षीदार शंकर जटाळे यांना गंभीर जखमी करून फिर्यादीचा भाउ प्रकाश याला गंभीर जखमी करून त्याचे मरणास कारण झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात पोलीस तपास करित आहेत.

**कॉपी राईट ॲक्ट सदरखाली दाखल गुन्हे:—**

दिनांक ३१/०१/२०२३ रोजी पोस्टे वसमत शहर येथे कलम ५१,६३ कॉपी राईट कायदा १९५७ अन्वये गुन्हा दाखल असुन यातील नमुद आरोपीने कॅस्ट्रोल एक्टीव ऑईल बॉटल सारखे दिसणारे बनावट केलेली बॉटल एक्टीवा असे खरे भासवुन ग्राहकांना विकत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रामीण पोलीस तपास करित आहेत.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि. ३१/०१/२०२३ रोजी पोस्टे हिंगोली शहर येथे ०४ इसमाविरूध्द कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ भादवी सहकलम ४/२५ भाहका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आले असुन पुढील तपास पोलीस करित आहेत.

**वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३१/०१/२०२३ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०५ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.